९०

जा. क्र. प्रा/प्राशि/मान्यता/पीआर
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे. १. यांचे कार्यालय.

दिनांक:- 15 DEC 1989

प्रति

शिक्षणाधिकारी [ प्राथमिक विभाग]
जिल्हा परिषद, पुणे-११.

विषय:- सन १९८९-९० या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. व्हीईएमएस १०८९/[४८३२] प्राशि-३ दिनांक ९.११.८९ चे पत्र.

---

उपरोक्त विषयासंबंधीचे आपले कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधीन पत्र कृपया अवलोकन करावे.

याबाबत कळविण्यात येते की, खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घातलेल्या सर्व साधारण बंदीला अपवाद करुन खाली नमूद केलेल्या संस्थेला तीच्या नावासमोर दर्शविल्या ठिकाणी व माध्यमातून जून १९८९ पासून इ. १ली ते सन ८९-९० या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह प्राथमिक शाळा सुरु करण्यास खालील नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तींवर विना अनुदान तत्वावर "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विना अनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटींवर परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम. |
| --- | --- | --- | --- |
| १) छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सांगवी जि. पुणे | सांगवी. | इ.१ ली ते ८९-९० मध्ये प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह | मराठी |

१] संस्था सदर शाळा विना अनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिक दृष्टया सक्षम असली पाहिजे.

२] संस्थेने शाळेसाठी शासनाने विहित केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मध्ये विहित केलेल्या अटींनुसार जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधांची सोय केली पाहिजे. तसेच शाळेसाठी विहित केलेल्या नियमानुसार विहित वयोमर्यादित व प्रशिक्षित शिक्षक नेमले पाहिजे व त्यांना शासनाने विहित केलेल्या पूर्ण वेतन [illegible] पाहिजेत.

३] संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांची उदा. वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या, विद्यार्थ्यांचे प्रवेश इ. काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

४] संस्थेने अदवयानच्या शाळेवर असल्या शाळेमुळे कोणतेही दुष्परिणाम होणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे.

५] ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खालील नमूद केलेल्या बाबींची खात्री करून घेऊन मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

२. संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३. सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४. संबंधित संस्थेत कोणताही प्रकारचा गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६. संस्थेने विहित नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे. [यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करून घ्यावा.].

७. शासनाची मंजूरी नसताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरित या कार्यालयात पाठवावा.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १.

प्रत:- प्रशासन अधिकारी/महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ, पिंपरी-चिंचवड जिल्हा पुणे ---- यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत:- मा. सचिव, छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सांगवी ता. हवेली जि. पुणे
यांना माहितीसाठी अग्रेषित.

पटवेकर/१५०४८९.

मुख्याध्यापक
नूतन प्राथमिक विद्यामंदिर
सांगवी, पुणे-४११०२७

मुख्याध्यापक
कै. सौ. शकुंतलाबाई आनंदराव शितोळे
प्राथमिक विद्यामंदिर सांगवी पुणे २७.

छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे

# कै. सौ. शकुंतलाबाई आनंदराव शितोळे प्राथमिक विद्यामंदिर

!! संहति कार्य साधिकः !!

मान्यता क्रमांक - महाराष्ट्र शासन क्रमांक व्हि. एल. एस. १०८९/सीआर/४८३९/ प्राशि-३ दि. १६ नोव्हे. १९८९

मुख्याध्यापक - **श्री. शिवाजीराव माने** एम.ए.एम.एड.एम.फिल

E-mail - sasprimeryschoolsangavi@gmail.com

**सांगवी, पुणे - ४११ ०२७. फोन नं. : ०२०-२७२८००३६ मो. : ७३५०९६३८६४**

जा.क्र. 2023/24 दिनांक :- 01/11/2023

## हमीपत्र

मी शिवाजी बापू माने मुख्याध्यापक, कै. सौ. शकुंतलाबाई आनंदराव शितोळे प्राथमिक विद्यामंदिर सांगवी (UDISE NO 27251901501) या शाळेत कार्यरत असून असे सत्यकथन करतो की सन २०१९ मध्ये महापूर आल्याने शाळेत पानी शिरले होते त्यावेळी खुप कागदपत्रांचे नुकसान झाले. त्यात शिक्षण उपसंचालक मान्यतेचा आदेश हरवला आहे. स्वमान्यता प्रस्तावासोबत सदर आदेशाची झेरॉक्स जोडत आहे. सदर झेरॉक्स ही खरी असून सत्य प्रत करून देत आहे. असे हमीपत्र लिहून देत आहे.

स्थळ :- सांगवी.

दिनांक :- 01/11/2023.

मुख्याध्यापक
कै.सौ.शकुंतलाबाई आनंदराव शितोळे
प्राथमिक विद्यामंदिर सांगवी पुणे २७.